


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217
वर्ष ३ रे अंक : ३४४ वा गुरूवार दि १६ एप्रिल २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# महाराष्ट्रातील विधानपरिषदेच्या ९ जागांसाठी निवडणुकीची घोषणा
## १२ मे रोजी मतदान, इच्छुकांची धाकधूक वाढली...



**वृत्तसंस्था/मुंबई**

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या रिक्त होणाऱ्या ९ जागांसाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रमाची घोषणा केली आहे. विधानपरिषदेच्या या ९ जागांसाठी २३ एप्रिलपासून अर्ज दाखल करता येणार असून १२ मे रोजी मतदान होणार आहे. मतदानाच्या दिवशीच सायंकाळी ५ वाजता मतमोजणी होणार आहे. उद्धव ठाकरे, शशिकांत शिंदे यांच्यासह ९ आमदारांचा कार्यकाळ १३ मे रोजी संपुष्टात येणार असल्याने रिक्त होणाऱ्या जागांसाठी ही निवडणूक होत आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार, २३ एप्रिल २०२६ पासून उमेदवारी अर्ज दाखल करता येणार असून ३० एप्रिल २०२६ ही उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख असणार आहे. २ मे २०२६ रोजी अर्जांची छाननी करण्यात येणार आहे, तर ४ मे २०२६ हा उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस आहे. विधानपरिषद निवडणुकीसाठी १२ मे २०२६ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत मतदान होणार असून त्याच दिवशी सायंकाळी ५ वाजता मतमोजणीला प्रारंभ होईल. दरम्यान, विधानसभेत असणाऱ्या संख्याबळानुसार विधानपरिषद निवडणुकीत ९ जागांपैकी ५ जागा भाजपच्या वाट्याला, २ जागा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला, १ जागा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या राष्ट्रवादीला आणि महाविकास आघाडीतील तीन पक्षांत मिळून एक जागा मिळण्याची शक्यता आहे.

# सुनेत्रा पवारांच्या प्रचारासाठी शरद पवारांची सभा होणार की नाही? रोहित पवारांनी पडद्यामागील घडामोडी सांगत केलं स्पष्ट

**वृत्तसंस्था/बारामती**

बारामतीची पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी, असा प्रयत्न राष्ट्रवादी काँग्रेसकडून करण्यात आला होता. मात्र, काँग्रेसकडून उमेदवारी मागे घेतली जाईल का, याबाबत शेवटपर्यंत संभ्रम होता. काही मुद्द्यांवर चर्चा केल्यानंतर काँग्रेसनेही माघार घेतली. यासाठी ज्येष्ठ नेते शरद पवार, सुप्रिया सुळे आणि आम्ही काही जणांनी केलेल्या प्रयत्नांमुळे परिस्थिती बदलली. त्यामुळेच आज प्रमुख पक्ष रिंगणात नाहीत, असे आमदार रोहित पवार यांनी स्पष्ट केले.आमदार रोहित पवार यांनी सुनेत्रा पवार यांच्या प्रचाराची सुरुवात कन्हेरी येथील मारुतीरायला नमस्कार करून केली आहे. त्या वेळी ते पत्रकारांशी बोलत होते. रोहित पवार म्हणाले, शरद पवार देशातील मोठे नेते आहेत. परिवार आणि राजकीय पातळीवर जे करायचे होते, ते त्यांनी शांतपणे आणि योग्य पद्धतीने केले. त्यामुळे त्यांच्याकडून स्वतंत्र सभांची अपेक्षा नाही. सुनेत्रा पवार यांना बारामतीकरांकडून मोठा पाठिंबा मिळत आहे. अजितदादांच्या कार्यावर विश्वास ठेवून मतदार सुनेत्रा पवार यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहतील.फ एकीकडे रोहित पवार हे काकी सुनेत्रा पवार यांच्यासाठी प्रचाराच्या मैदानात उतरलेले असताना दुसरीकडे भाजपचे नेतेही गाठीभेटी घेत आहेत. ङ्गराज्यात महायुतीचे सरकार असून, भाजप हा प्रमुख घटक पक्ष म्हणून बारामतीच्या निवडणुकीत पूर्ण ताकदीने काम करीत आहे. ही निवडणूक एकतर्फी असली, तरी यंत्रणा ढिली पडू नये, यासाठी आम्ही सजग असून, बारामतीत महायुतीची एकजूट आहे. सुनेत्रा पवार यांचा विक्रमी विजय निश्चित आहे, असा विश्वास भाजप नेते आणि मंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केला. बारामतीच्या दौऱ्यावर आले असता, चंद्रकांत पाटील बोलत होते. ते म्हणाले, भाजप हा असा पक्ष आहे, जो एक निवडणूक संपताच पुढील निवडणुकीच्या तयारीला लागतो. जिंकण्याची शक्यता कमी असली तरी आम्ही लढतो; कारण लढल्याशिवाय विजय मिळत नाही. याच वृत्तीमुळे आज देशातील २१ राज्यांत भाजपचे मुख्यमंत्री किंवा उपमुख्यमंत्री आहेत. सन २०२९मध्ये राज्यात महायुती म्हणून सर्व निवडणुका लढवल्या जातील. ज्या पक्षाला जागा मिळेल, त्याला इतर घटक पक्षांनी पूर्ण ताकदीने पाठिंबा द्यायचा असतो.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# चिंतेचे मोसमी फवारे....



एल निनोफ घटक सक्रिय होण्याच्या शक्यतेमुळे यंदा महाराष्ट्रासह देशाच्या प्रमुख भागांमध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस होण्याचा हवामानशास्त्र विभागाचा अंदाज, हा शेतकऱ्यांसह धोरणकर्त्यांच्याही चिंतेत भर घालणारा आहे. यंदा सरासरीच्या ९२ टक्के इतकाच पाऊस होण्याचा विभागाचा प्राथमिक अंदाज आहे. गेल्या वर्षीच्या अतिवृष्टीमुळे बसलेल्या फटक्यातून बहुतांश शेतकरी अजूनही सावरलेले नाहीत; अशा काळात येणाऱ्या मान्सूनने पाठ फिरवण्याने पुन्हा नव्या संकटाला सामोरे जाण्याची वेळ येऊ शकते उत्तर भारतातील मोठ्या भागांत, विशेषत: गंगेचा मैदानी प्रदेश आणि पठारी भागात; तसेच विदर्भ आणि मराठवाड्यातील काही जिल्हे वगळता महाराष्ट्राच्या अन्य भागांमध्येही अपुरे पाऊसमान राहील, असे हा अंदाज सांगतो. मान्सूनच्या काळात या पावसाचे वितरण कसे राहील; म्हणजेच कोणत्या काळात आणि कोणत्या भागांत किती पाऊस होईल, याबाबत पुढील महिन्यात जाहीर होणाऱ्या अंदाजात नेमके चित्र समोर येईल; मात्र शेतकरी आणि प्रशासनालाही संभाव्य संकटाचा मुकाबला करण्यासाठी सज्ज राहण्याचा इशारा या प्राथमिक अंदाजाने दिला आहे. आजही देशातील सुमारे साठ टक्के शेती पावसावरच अवलंबून आहे. गेल्या तीन वर्षांचा विचार करता, सन २०२३मध्ये पाऊसमान कमी राहिले. सन २०२४ मध्ये जास्त पाऊस झाला आणि गेल्या वर्षी तर अतिवृष्टीने शेतकऱ्यांची दाणादाण उडवून दिली. त्या पार्श्वभूमीवर यंदा पाऊस सरासरी गाठणार नाही, असा अंदाज आहे. जून ते सप्टेंबर या मान्सूनच्या महिन्यांत हा घटक सक्रिय होणार आहे. पाऊस वेळेत न आल्यास दुबार पेरण्यांची वेळ येऊ शकते किंवा नंतर त्याने ओढ दिल्यास वाढीच्या काळातच पिकांना त्याचा फटका बसू शकतो. परिणामी भात, ज्वारी-बाजरी, कापूस, सोयाबीन, वेगवेगळ्या डाळी आणि तेलबियांसारख्या पिकांच्या उत्पादनात घट होऊ शकते. सध्या राज्यभरात तीव्र उन्हाळा जाणवत असून येत्या काही काळात मराठवाडा, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रात उष्णतेच्या लाटेचे इशारे देण्यात आले आहेत. अशा काळात जमिनीतील ओल निघून जाते आणि जलसाठ्यांमधील पाण्याच्या बाष्पीभवनाचे प्रमाणही वाढते. त्या पार्श्वभूमीवर पाऊसही अपुरा होणे शेतकऱ्यांसाठी त्रासदायक ठरणार आहे. गेल्या वर्षी राज्याच्या अनेक भागांमध्ये अतिवृष्टीने पिके हातून गेली; तसेच जमिनींचा सुपीक थरही खरवडून गेल्याने अनेक जिल्ह्यांमध्ये आधीच शेतकरी हैराण आहेत. त्यात अपुऱ्या पावसाने आणखी काय अडचणी उभ्या राहणार, याची नवी चिंता उभी राहिली आहे. यासाठी स्वत: शेतकरी आणि प्रशासनानेही आताच योग्य नियोजन करण्याची गरज आहे. दुष्काळ-अतिवृष्टीसारख्या नैसर्गिक आपत्तींबरोबरच मानवनिर्मित संकटांचा बळी हा शेतकरीच ठरतो, हा दैवदुर्विलास आहे. सध्या अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्धस्थितीमुळे सारे जग होरपळत आहे. भारतातही गॅसटंचाईबरोबरच इंधनाची संभाव्य टंचाई आणि खतांच्या तुटवड्याचे संकट भेडसावत आहे. आपल्याकडे प्रामुख्याने रशिया व चीनसह सौदी अरेबिया, ओमान, कतार आणि संयुक्त अरब अमिरातींमधून खतांची आयात होते. ङ्गहोर्मुझफच्या सामुद्रधुनीतील वाहतूक बंद असल्याने मध्यपूर्वेतून खतांचा पुरवठा विस्कळित झाला आहे, त्यावर तातडीने पर्याय शोधावा लागेल आणि खतांची भेसळ व काळा बाजारही रोखावा लागेल. त्याबरोबरच कमी पावसावर तग धरणाऱ्या पिकांचाही विचार करावा लागेल. उपलब्ध जलसाठ्यांचे योग्य नियोजन, जलसंधारण आणि पाण्याचा फेरवापर यासाठी धोरणे आखून त्याची कडक अंमलबजावणी करावी लागेल; तसेच ठिबक सिंचन आणि तुषार सिंचनाचेही नवे तंत्रज्ञान वाजवी दरांत शेतकऱ्यांना पुरवावे लागेल. या युद्धस्थितीमुळे आंबे, द्राक्षे यांसह मोठ्या शेतीमालाची निर्यातही रखडल्यामुळे राज्यातील अनेक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. त्यातच खते-कीटनाशके आणि मजुरीच्या दरांत मोठी वाढ झाल्याने शेतमालाचा उत्पादन खर्च प्रचंड वाढला आहे; त्या तुलनेत मालाला दर मिळत नसल्याने शेती आतबट्ट्याची ठरत आहे. या मालिकेत आणखी नवे संकट शेतकरीच नव्हे, तर साऱ्या अर्थव्यवस्थेला झेपणारे नाही. गेला काही काळ नियंत्रणात असलेल्या महागाईमध्ये गेल्या महिन्यांत युद्धस्थितीने काहीशी वाढ झाली. कमी-अधिक पावसाचे निसर्गचक्र रोखता येत नसले, तरी यंत्रणा सज्ज ठेवून संकटाला सामोरे जाण्याचे नियोजन नक्कीच करता येते. सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज लक्षात घेऊन आपत्कालीन नियोजनाची आतापासूनच तयारी करायला हवी.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!


## १२ अग्निशमन अधिकारी, जवानांना राष्ट्रपती पदके प्रदान

# अग्निशमन सेवा सप्ताहाचे उदघाटन

**मुंबई/वृत्तसंस्था**



राष्ट्रीय अग्निशमन दिनानिमित्त आज राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत लोकभवन मुंबई येथे अग्निशमन सेवा सप्ताहाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी मुंबई अग्निशमन दल, एमआयडीसी व महाराष्ट्र अग्निशमन सेवेतील 12 अग्निशमन अधिकारी व कर्मचाऱ्यांना राज्यपालांच्या हस्ते अग्निशमन सेवेकरिता जाहीर झालेले राष्ट्रपती पदक समारंभपूर्वक प्रदान करण्यात आले.

गेल्या काही दशकांत अग्निशमन दलासमोरील आव्हाने अनेक पटींनी वाढली आहेत. नागरीकरण, उंच इमारती, भूमिगत व भुयारी मेट्रो, तसेच वाढते औद्योगिक क्षेत्र यामुळे आपत्कालीन परिस्थितीचे स्वरूप गुंतागुंतीचे झाले आहे. मोठाली गोदामे आणि डेटा सेंटर्स ही काळाची गरज झाली आहेत. त्यामुळे औद्योगिक आगींपासून ते अत्याधुनिक डेटा सेंटर्स संबंधित आगीपर्यंत विविध प्रकारच्या आव्हानांना अग्निशमन दलांना सामोरे जावे लागत आहे, असे राज्यपालांनी सांगितले.

अग्निशमन सेवा केवळ आग विझविण्यापुरती मर्यादित राहिलेली नसून महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधा, औद्योगिक संपत्ती आणि सार्वजनिक ठिकाणांचे संरक्षण करणे ही देखील तिची जबाबदारी झाली आहे, असे ते म्हणाले. अलीकडच्या काळात गॅस व रासायनिक आगी, तसेच ई-कार्स आणि इतर विद्युत उपकरणांमधील लिथियम-आयन बॅटरीमुळे आगींच्या घटना घडल्या आहेत. आग प्रतिबंध, शोध आणि कारणांचे विश्लेषण आदी क्षेत्रांत कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर करणे अत्यावश्यक आहे, असे राज्यपालांनी सांगितले. बदलत्या परिस्थितीत अग्निशमन सेवेतील अधिकारी कर्मचाऱ्यांचे कौशल्य वर्धन, प्रशिक्षण आणि पायाभूत सुविधा सातत्याने अद्ययावत करणे गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले. महाराष्ट्रात अग्निशमन सेवांच्या आधुनिकीकरणासाठी 15 व्या वित्त आयोगांतर्गत 614 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे, असे सांगून हा निधी शहरी तसेच ग्रामीण भागात प्रभावी अग्निसुरक्षा सेवा पुरविण्यास निश्चितच मदत करेल, असे राज्यपालांनी सांगितले. महाराष्ट्रात अग्निविज्ञान क्षेत्रातील संशोधनासाठी स्वतंत्र संस्थेची स्थापना करणे अथवा विद्यमान संस्थांचे बळकटीकरण करणे आवश्यक आहे. यामध्ये आग नियंत्रणासाठी नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा शोध, पर्यावरणपूरक अग्निशामक साधनांचा विकास आणि औद्योगिक व बिगरऔद्योगिक आस्थापनांचे सर्वंकष अग्निसुरक्षा ऑडिट यांचा समावेश असावा, असे राज्यपालांनी सांगितले. याशिवाय, विद्यापीठे व शैक्षणिक संस्थांना अग्निसुरक्षा सराव, जनजागृती मोहिमा आणि आपत्ती व्यवस्थापन उपक्रमांमध्ये सक्रियपणे सहभागी करून घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे, असे त्यांनी सांगितले. यावेळी राज्यपालांच्या हस्ते मुख्य अग्निशमन अधिकारी, एमआयडीसी संतोष वारिक, मुंबई अग्निशमन दलाचे उपमुख्य अग्निशमन अधिकारी अनिल परब, मुंबई अग्निशमन दलाचे उपमुख्य अग्निशमन अधिकारी हरिश्चंद्र रघु शेट्टी, विभागीय अग्निशमन अधिकारी देवेंद्र पाटील, सब ऑफिसर राजाराम कुदळे, सब ऑफिसर अनंत धोत्रे, लिडींग फायरमन किशोर म्हात्रे, लिडींग फायरमन मुरलीधर आंधळे, लिडींग फायरमन मोहन तोसकर, लिडींग फायरमन मुकेश काटे, विभागीय अग्निशमन अधिकारी किशोर घाडीगावकर व वरिष्ठ प्रशिक्षक किरण हत्याळ यांना राष्ट्रपती पदक प्रदान करण्यात आले.

सुरुवातीला महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालक संतोष वारिक यांनी राज्यपालांच्या जॅकेटला अग्निशमन ध्वजाचे स्टॅम्प तिकीट लावले. राज्यपालांनी अग्निशमन सेवा कर्मचारी कल्याण निधीला आपले योगदान दिले तसेच जनतेला निधीसाठी अधिकाधिक योगदान देण्याचे आवाहन केले. संचालक संतोष वारिक यांनी प्रास्ताविक केले तर मुंबई अग्निशमन दलाचे मुख्य अग्निशमन अधिकारी रवींद्र आंबुलगेकर यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाला मुंबई अग्निशमन दल, औद्योगिक आस्थापना तसेच महाराष्ट्र अग्निशमन सेवेतील वरिष्ठ अग्निशमन अधिकारी व पुरस्कारप्राप्त अधिकाऱ्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

---

## परवानाधारक रिक्षा व टॅक्सी चालकांसाठी १ मे पासून मराठीभाषा आवश्यक : प्रताप सरनाईक

**मुंबई/वृत्तसंस्था**



येत्या 1 मे, महाराष्ट्र दिनापासून परवानाधारक रिक्षा व टॅक्सी चालकांना मराठी भाषा येणे आवश्यक करण्यात येणार आहे. याबाबत मोटार परिवहन विभागाच्या 59 प्रादेशिक व उपप्रादेशिक कार्यालयांमार्फत परवाना तपासणी मोहीम राबविण्यात येणार असून संबंधित चालकांना मराठी लिहिता व वाचता येते का, याची पडताळणी केली जाणार आहे. मराठी भाषेचे ज्ञान नसलेल्या चालकांचे परवाने रद्द करण्यात येतील, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. मंत्री सरनाईक म्हणाले की, मोटार परिवहन विभागामार्फत रिक्षा किंवा टॅक्सी चालकांना परवाना देताना स्थानिक भाषेचे, म्हणजेच मराठी भाषेचे ज्ञान असणे, हा नियम आधीपासूनच लागू आहे. मात्र, मुंबई महानगर क्षेत्र, छत्रपती संभाजीनगर, नागपूर यांसारख्या शहरांमध्ये अनेक परवानाधारक चालकांना प्रवाशांशी मराठीत संवाद साधता येत नाही, तसेच काही चालक मराठी बोलण्यास टाळाटाळ करतात, अशा तक्रारी मोठ्या प्रमाणात प्राप्त झाल्या आहेत.

मंत्री सरनाईक म्हणाले की, ज्या प्रदेशात आपण राहतो त्या प्रदेशाची भाषा व्यवसायासाठी शिकणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. आपल्या मातृभाषेचा अभिमान असणे जितके आवश्यक आहे, तितकेच इतर राज्यात व्यवसाय करताना त्या राज्याच्या भाषेचा आदर करणेही महत्त्वाचे असल्याचेही ते म्हणाले. म्हणूनच 1 मेपासून सर्व परवानाधारक रिक्षा व टॅक्सी चालकांना मराठी भाषा लिहिता येणे व वाचता येणे बंधनकारक राहील. नियमांचे पालन न करणाऱ्या चालकांचे परवाने रद्द करण्यात येतील. तसेच नियमांकडे दुर्लक्ष करून चुकीच्या पद्धतीने परवाने देणाऱ्या परिवहन अधिकाऱ्यांवरही कठोर कारवाई करण्यात येईल.

---

## युद्धामुळे गरिबी वाढण्याचा धोका; भारताला इशारा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था**




पश्चिम आशियातील युद्ध आणि लष्करी तणाव यामुळे भारतात २५ लाख लोक दारिद्र्यरेषेखाली ढकलले जाण्याचा धोका आहे, असा इशारा संयुक्त राष्ट्रांनी दिला आहे. त्याशिवाय गेल्या काही काळात मानवी विकासासंबंधी भारताने केलेल्या प्रगतीचा आलेखही खाली येण्याची शक्यता असल्याचे संयुक्त राष्ट्रांनी वर्तवलेल्या अंदाजात नमूद करण्यात आले आहे.

अहवालानुसार, युद्धामुळे मानवी विकासावर विपरित परिणाम होणार आहे. इंधन, मालवाहतूक आणि कच्च्या मालाची दरवाढ; कुटुंबांच्या क्रयशक्तीत घट; वाढती अन्न असुरक्षितता; सार्वजनिक खर्चावर वाढणारा ताण आणि उपजीविकेची कमी होणारी साधने याला कारणीभूत असतील, असे 'यूएनडीपी'च्या प्राथमिक मूल्यांकनात नमूद करण्यात आले आहे. याचा एकत्रित परिणाम म्हणून आशिया-पॅसिफिक प्रदेशात मानव विकास निर्देशांकही घसरण्याची शक्यता आहे.

या मूल्यांकनानुसार, जगभरात ८८ लाख लोक दारिद्र्यरेषेखाली जातील. त्यामध्ये दक्षिण आशियाई देशांचा वाटा सर्वात मोठा म्हणजे ८० लाख इतका असेल. युद्धामुळे आशिया-पॅसिफिक प्रदेशातील देशांचे २९९ अब्ज डॉलरचे नुकसान होऊ शकते. दक्षिण आशियातील प्रचंड लोकसंख्या आणि त्यांना उत्पन्न व किंमतीमधील फरक यामुळे या भागाला मोठा धक्का बसण्याची भीती आहे. चीनमध्ये आणखी सहा लाख लोक दारिद्र्यरेषेखाली जाण्याची शक्यता आहे. युद्ध सुरू होण्यापूर्वी भारतात दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण ३५ कोटी १५ लाख ६९ हजार इतके होते. युद्धानंतर ते वाढून ३५ कोटी ४० लाख ३३ हजार इतके होईल. मालवाहतुकीवरील अधिभार, युद्धाच्या जोखमीशी संबंधित विमा, जहाजाचा मार्ग बदलण्याची गरज, पक्क्या मालाच्या उत्पादनासाठी आवश्यक माल व ग्राहक वस्तूंच्या वितरणात विलंब याचा २५ देशांना फटका बसेल.

---

## अनु.जाती आरक्षण उपवर्गीकरणावरून वाद तीव्र

**मुंबई/वृत्तसंस्था**



अनुसूचित जातीच्या १३ टक्के आरक्षणाचे अ, ब, क, ड असे करण्यात येणारे उपवर्गीकरण अशास्त्रीय पद्धतीने रेटले जात असून यामागे आरक्षणाचे मूळ उद्दीष्ट संपवण्याचे सत्ताधाऱ्यांचे षडयंत्र आहे, असा आरोप करत याप्रकरणी सरकारने जपून पावले टाकीवीत, समाजात मोठी खदखद आहे, असा इशारा वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी दिला आहे.

अनुसूचित जाती- जमातीच्या आरक्षणाला हात लावण्याचा राज्यांना अधिकार नाही, तो संसदेचा अधिकार आहे. मात्र सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालात राज्यांना मुभा दिली. महायुती सरकारने याप्रकरणी न्या. बदर समिती नेमली, त्या समितीने समाजातल्या कोणत्याही घटकांशी चर्चा केली नाही. समितीचा अहवाल सार्वजनिक नाही. आणि त्यावर निवेदन मागवली आहेत. आंबेडकर जयंती मध्ये समाज मग्न असताना सरकार उपवर्गीकरण पुढे रेटत आहे, असा आरोप आंबेडकर यांनी केला.

कर्नाटक राज्यात उपवर्गीकरण करताना शास्त्रीय व संविधानिक पद्धती अवलंबली होती. तसा प्रयत्न महाराष्ट्रात होत नाही. उपवर्गीकरणाविषयी दुमत नाही, मात्र पद्धती चुकीची आहे. सरकारने न्या. बदर समितीचा अहवाल जाहीर करावा. उप वर्गीकरणाचा आधार व पद्धती सांगा. आपण याप्रकरणी मुख्यमंत्र्यांची भेट घेणार आहोत. याप्रकरणी आंबेडकरी समाजात खदखद आहे. ती कधीही बाहेर पडू शकते. सामाजिक तणाव वाढू नये यासाठी सरकारने सावध पावले टाकवीत, असा इशारा आंबेडकर यांनी दिला.

महायुती सरकारकडून केले जाणारे उपवर्गीकरण बेकायदेशीर असून यामुळे कायदेशीर आणि घटनात्मक पेच निर्माण होऊ शकतो. सर्वोच्च न्यायालयाच्या सात न्यायाधीशांच्या खंडपीठाने उप-वर्गीकरणाचा अधिकार राज्य सरकारांना दिला असला तरी मूळ सूचीमध्ये बदल करण्याचा अधिकार केवळ संसदेलाच आहे. राज्य सरकारांना हा अधिकार मिळाल्यास आरक्षणाचे राजकीयकरण होईल आणि आरक्षणाच्या मूळ हेतूला तडा जाईल. अनुसूचित जाती आरक्षणातून उन्नत गटांना बाहेर काढण्याच्या प्रक्रियेत पारदर्शकता असली पाहिजे. सत्ताधाऱ्यांनी या विषयांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. विरोधी पक्षांनी याबाबत भूमिका मांडली पाहिजे, अशी भूमिका आंबेडकर यांनी मांडली.

याप्रकरणी अनुसूचित जातीचे आमदार लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार आहेत, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) अर्जुनी मोरगावचे आमदार व माजी सामाजिक न्याय मंत्री राजकुमार बडोले यांनी सांगितले. उपवर्गीकरणासंदर्भात आंबेडकरी समाजात मोठा असंतोष असून ज्या पद्धतीने उपवर्गीकरण प्रकरण घाईघाईने हाताळले जात आहे, ते चुकीचे आहे, असे बडोले यांचे म्हणणे आहे.

# देशभरात कामगारांचे आंदोलन उग्र; नोएडामध्ये हिंसाचाराची घटना

## कामगार संहितेच्या अंमलबजावणीतील विलंबामुळे असंतोष तीव्र

■ नोएडा/वृत्तसंस्था

नोएडामध्ये कामगार व पोलिसांमध्ये सोमवारी हिंसाचार झाला आहे. कामगारांनी वाहनांची जाळपोळ केली. या वर्षाच्या सुरुवातीपासूनच देशभरातील औद्योगिक पट्ट्यांमध्ये कामगारांची आंदोलने सुरू आहेत. पश्चिम आशियातील इराण युद्धामुळे इंधन टंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळे कामगारांमधील असंतोष आणखी वाढला आहे. देशातील किमान पाच मोठ्या शहरांमधील औद्योगिक पट्ट्यांमध्ये कामगारांनी आंदोलने केली आहेत. २ फेब्रुवारी रोजी बिहारमधील बरौनीत, त्यानंतर हिऱ्यांची बाजारपेठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सुरतमध्ये, ऑटोमोबाइल आणि इलेक्ट्रॉनिक्स हब असलेल्या मानेसारमध्ये, कापड गिरण्या असलेल्या पाणिपतमध्ये आणि फुटवेअर आणि कापड उद्योग मोठ्या संख्येने असलेल्या नोएडामध्ये कामगारांची आंदोलने झाली.



सर्वात आधी फेब्रुवारी महिन्यात बिहारमधील बरौनी जिल्ह्यात कामगारांनी आंदोलन केले. मजुरी वाढवण्याची मागणी त्यांनी केली. तसेच कामाचा वेळ आठ तास करावा, प्रोव्हिडेंट फंड आणि 'इम्प्लॉयीज स्टेट इन्शुरन्स कॉर्पोरेशन'चा (ESIC) लाभ द्यावा अशी मागणी कर्मचाऱ्यांनी केली होती. त्यानंतर २३ फेब्रुवारी रोजी पाणिपत मधील इंडियन ऑइल कॉर्पोरेशनच्या रिफायनरीत किमान ३० हजार कंत्राटी कामगारांनी आंदोलन केले होते. चांगली मजुरी मिळावी आणि कामाच्या ठिकाणी चांगले वातावरण मिळावे या मागण्या करण्यात आल्या होत्या. या आंदोलनाला हिंसक वळण लागले होते. संतप्त कामगारांनी सुरक्षा कर्मचाऱ्यांवर दगडफेक व वाहनांची तोडफोड केली होती. त्यानंतर २७ फेब्रुवारी रोजी लारसेन अँड टुब्रो (एल अँड टी) कंपनीच्या ५ हजार कंत्राटी कामगारांनी सुरतमधील हाजिरा येथे हिंसक आंदोलन केले. त्यात अनेक पोलीस जखमी झाले होते. तसेच अनेक वाहने पेटवून देण्यात आली होती. एलपीजी सिलिंडरचा तुटवडा झाल्याने कामगारांचा खर्च वाढला आहे. मार्च महिन्यात देखील सुरत, मानेसार आणि नोएडातील औद्योगिक पट्ट्यात आंदोलने झाली.

एलपीजी सिलिंडर विकत घेण्यासाठी कामगार कंपन्यांकडे अतिरिक्त पैसे देण्याची मागणी करत आहेत. 'इंडियन एक्स्प्रेस'ने दिलेल्या वृत्तानुसार, एलपीजी सिलिंडरचे काळ्या बाजारातील भाव तीन ते चार पट वाढले आहेत. सोमवारी नोएडामध्ये कामगारांनी दगडफेक, तोडफोड आणि जाळपोळ केल्याचे समोर आले. कामगार संघटनांच्या नेत्यांनी म्हटले आहे की, त्यांना मागील पाच दिवसांपासून घरातच कैद ठेवण्यात आले आहे. हरयाणा सरकारने कामगारांच्या मजुरीत वाढ केल्यानंतर इतर राज्यांतील कामगार त्यांच्या मजुरीत ३५ टक्के वाढ करण्याची मागणी करत आहेत.

नोएडात ८ एप्रिलपासून आंदोलन सुरू झाल्यानंतर कंत्राटी कर्मचाऱ्यांचे म्हणणे कोणीही ऐकून घेत नसल्याने कामगार संघटनांच्या नेत्यांनी तीव्र चिंता व संताप व्यक्त केला आहे. "जर कामगारांबरोबर चर्चाच होणार नसेल तर त्यांना समजेल कसे? गारमेंट्स, आयटी, कॉल सेंटर या उद्योगांमध्ये देखील आंदोलने होत आहेत. नवीन कामगार संहितेबाबत कामगार जागरूक आहेत. कामगार संहितेनुसार मजुरीत वाढ करावी, अशी मागणी ते करत आहेत. या आधी किमान मजुरीत २०१२ मध्ये वाढ झाली होती. आता पुन्हा एकदा वाढ करण्याची मागणी होत आहे", असे नोएडामधील AITUC या कामगार संघटनेचे नेते नईम म्हणाले.


# इरशाळगडावर ट्रेकिंग साठी गेलेल्या तरुणाचा दरीत पडून मृत्यू..

■ अलिबाग/वृत्तसंस्था

लहानपणापासून त्याला ट्रेकिंगची आवड होती. कधी मित्रांसमवेत तर कधी एकटाच वेळ मिळेल तसा तो ट्रेकिंगला जात होता. पण ट्रेकिंगची ही आवड कधी त्याच्या जीववर बेतेल असे त्याला वाटते नव्हते. निसर्गाच्या सानिध्यात मनसोक्त हिंडायचं हेच त्याच ध्येय होत. याच ध्येयाच्या पाठीमागे धावताना एक अपघात झाला आणि सारच संपलं.

भिवंडी येथील 26 वर्षाचा आकाश रामचंद्र वाघमोडे यांचा रायगड जिल्ह्यातील इरशाळगडावरून दरीत पडून मृत्यू झाला. रविवारी सकाळी तो घरातून एकटाच ट्रेकिंग साठी बाहेर पडला होता. इरशाळगडावर पोहोचण्यापूर्वी दहा वाजता त्याने त्याच्या आईशी फोनवरून संपर्क केला होता. त्यानंतर त्याच्याशी संपर्क होत नव्हता. त्यामुळे सर्वच जण चिंतेत होते. खालापूर पोलिसांना याबाबतची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी स्थानिक बचाव पथकाच्या मदतीने आकाशचा





शोध घेण्याच मोहीम सुरू केली होती. मोबाईल लोकेशन मदतीने त्याचा शोध सुरू करण्यात आला. खोपोली येथील हेल्प फाउंडेशन चे सदस्य या मोहिमेत पोलिसांचा समवेत सहभागी झाले होते. त्याची गाडी इरशाळगडाच्या पायथ्याशी उभी होती. फोन वाजत होता. पण तो प्रतिसाद देत नव्हता. त्यामुळे सगळेच चिंतेत होते. पोलिसांनी स्थानिकांच्या मदतीने तसेच हेल्प फाउंडेशनच्या सहकार्याने आकाश चा शोध सुरू केला. दुपारी तीनशे फूट खोल दरीत आकाशचा मृतदेह आढळून आला. मृतदेह कुजलेल्या अवस्थेत होता. प्रशिक्षित बचाव पथकांच्या मदतीने रात्री साडेआठच्या सुमारास मृतदेह पोलिसांनी दरीतून बाहेर काढला.

# बॉयलरच्या स्फोटात नऊ ठार; छत्तीसगड मधील खासगी विद्युत प्रकल्पात दुर्घटना

■ सक्ती (छत्तीसगड)/वृत्तसंस्था

छत्तीसगडच्या सक्ती जिल्ह्यात मंगळवारी एका खासगी विद्युत प्रकल्पात बॉयलरचा स्फोट होऊन नऊ कामगारांचा मृत्यू झाला आणि अन्य १५ जण जखमी झाले, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. प्राथमिक माहितीनुसार, सिंघीतराई गावातील वेदांता लिमिटेड विद्युत प्रकल्पामध्ये मंगळवारी दुपारी बॉयलरच्या नलिकेत स्फोट झाला, असे सक्तीचे पोलीस अधीक्षक प्रफुल्ल ठाकूर यांनी दिली.

या दुर्घटनेत तिघेजण जागीच ठार झाले तर सहा जणांनी रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. शेजारच्या रायगड जिल्ह्यातील रुग्णालयांमध्ये जखमींवर उपचार सुरू असल्याचे ठाकूर यांनी सांगितले. स्फोटानंतर स्थानिक प्रशासन आणि पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि मदतकार्याला सुरुवात केली. बॉयलरच्या आजूबाजूचा भाग अतिशय गरम असतो. त्या भागातून अन्य कामगार आणि कर्मचाऱ्यांना बाहेर काढण्यात




आले. घटनास्थळी आणखी कोणी अडकले आहे का याचा तपास उशिरापर्यंत सुरू होता. राज्याचे मुख्यमंत्री विष्णूदेव साई यांनी या घटनेबद्दल दुःख व्यक्त केले असून सरकार मृतांच्या कुटुंबीयांबरोबर असल्याचे सांगितले. या दुर्घटनेची चौकशी केली जाईल आणि जे जबाबदार असतील त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा त्यांनी पत्रकारांशी बोलताना दिला. कारखान्याच्या व्यवस्थापनाने एक निवेदन प्रसिद्ध करून सांगितले की, जखमी झालेल्यांना शक्य ते सर्वोत्तम वैद्यकीय उपचार उपलब्ध करून देण्यास आम्ही प्राधान्य देत आहोत. या घटनेची चौकशी केली जाईल, असे कंपनीकडून सांगण्यात आले.

# साताऱ्यात नवविवाहितेचा १२ व्या दिवशीच मृत्यू; घातपाताचा आरोप

■ सातारा/वृत्तसंस्था

अवघ्या १२ दिवसांपूर्वी प्रेमविवाह केलेल्या नवविवाहितेचा मृत्यू झाल्याने साताऱ्यात मंगळवारी खळबळ उडाली. मुलीच्या कुटुंबीयांनी घातपातातून तिचा मृत्यू झाल्याची तक्रार पोलिसांकडे दाखल केली आहे. रात्री उशिरा या प्रकरणी पतीविरुद्ध सातारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान या घटनेनंतर परिसरात तणाव निर्माण झाला होता.

भाग्यश्री संजय मोटे (वय २१, मूळ रा. पांढरेवाडी, ता. आटपाडी, जि. सांगली सध्या रा. विकासनगर, सातारा) असे मृत्यू झालेल्या विवाहितेचे नाव आहे. याबाबत प्राथमिक माहिती अशी, भाग्यश्री ३० मार्च रोजी बेपत्ता झाली होती. या घटनेनंतर त्याच दिवशी राजकुमार लालासो कांबळे



(२५, मूळ रा. पुळकोटी, ता. माण, जि. सातारा सध्या रा. विकासनगर, सातारा)-याच्यासोबत भाग्यश्रीचा विवाह झाल्याचे मोटे कुटुंबीयांना समजले. यानंतर राजकुमार कांबळे व मोटे कुटुंबीयांची चर्चा झाली. या चर्चेमध्ये कांबळे कुटुंबीयांनी हुंडा मागितल्याचा आरोप मोटे कुटुंबीयांनी आपल्या तक्रारीत केला आहे.

दरम्यान १२ एप्रिल रोजी राजकुमार याने मोटे कुटुंबीयांशी संपर्क करत 'तुमची मुलगी भाग्यश्री हिला सातारा जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे. तुम्ही लवकर या,' असे सांगितले. मोटे कुटुंबीय साताऱ्यात आल्यानंतर मुलगी भाग्यश्रीचा मृत्यू झाला असल्याचे सांगण्यात आले. या घटनेने ते हादरून गेले. हुंड्यासाठी तिचा छळ झाल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. यानंतर त्यांनी पोलिसात तक्रार दिली. रात्री उशिरा या प्रकरणी पतीविरुद्ध सातारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान या घटनेनंतर परिसरात तणाव निर्माण झाला होता.

आरफळ (ता. सातारा) गावच्या हद्दीत एकाने पत्नीच्या समोर पतीच्या डोक्यात खोरे घालून खून केल्याची घटना घडली. यामध्ये अमर मुगुटराव नलगे (वय ४०, रा. आरफळ ता सातारा) यांचा मृत्यू झाला. ऋषिकेश मारुती कासकर (२५) हा संशयित आरोपी पसार झाला होता. सातारा तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नीलेश तांबे आणि पथकाने कासकर याचा शोध घेऊन त्याला अटक केली आहे.

आरफळ-वनगळ रस्त्यालगत 'गावंदर'शिवारात अमर नलगे व त्यांची पत्नी रेश्मा नलगे शेतात काम करत होते. या वेळी तिथे आलेल्या कासकरसोबत वाद सुरू झाला. यातून कासकरने पत्नीसमोरच अमर नलगे यांच्या डोक्यावर खोऱ्याने जोरदार प्रहार केला. यामध्ये अमर नलगे हे गंभीर जखमी झाले. यानंतर पत्नी व ग्रामस्थांनी नलगे यांना उपचारासाठी रुग्णालयात नेले. मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला.

# सीएसकेने कोलकातासमोर चेपॉकचा गड राखला! केकेआरचा स्पर्धेतील चौथा पराभव

■ मुंबई, वृत्तसंस्था :

सीएसकेने केकेआरचा पराभव करत चेपॉकचा गड राखला आहे. कोलकाता नाईट रायडर्सला या स्पर्धेतील चौथ्या पराभवाला सामोरं जावं लागलं आहे. केकेआरला अद्याप स्पर्धेत विजयाचं खातं उघडता आलेलं नाही. चेन्नईच्या गोलंदाजांनी चांगली गोलंदाजी करत केकेआरच्या फलंदाजांना झटपट माघारी धाडत धावांनी ३२ विजय मिळवला.

कोलकाता नाईट रायडर्स संघाने या पराभवासह स्पर्धेतील चौथा पराभव नोंदवला आहे. केकेआरचा पंजाब किंग्सविरूद्धचा सामना पावसामुळे रद्द झाल्याने संघाने एका गुणासह खातं उघडलं. पण विजय मात्र संघ मिळवू शकला नाही. तर चेन्नई संघाचा हा स्पर्धेतील सलग दुसरा विजय आहे.



सीएसकेने दिलेल्या १९३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना केकेआरची सुरूवात खराब झाली. फिन एलन १ धावा करत बाद झाला. यानंतर सुनील नरेन २४ धावा, अजिंक्य रहाणे २८ धावा आणि अंगक्रिश रघुवंशीने २७ धावांचं योगदान दिलं. यानंतर रिंकू सिंग ६ धावा तर कॅमेरून ग्रीन गोल्डन डकवर बोल्ड झाला. यानंतर रोव्हमन पॉवेल आणि रमणदीप सिंग यांनी अर्धशतकी भागीदारी रचत संघाचा डाव सावरला. पण संघाला विजय मात्र मिळवून देऊ शकले नाहीत. रमणदीप सिंग ३५ धावा करत झेलबाद झाला. तर रोव्हमन पॉवेल ३१ धावा करत नाबाद परतला. यासह केकेआरचा संघ २० षटकांत ७ बाद १६० धावाच करू शकला. सीएसकेकडून नूर अहमदने ३ विकेट्स आणि अंशुल कंबोजने २ विकेट्स घेतल्या. तर खलील अहमद व अकील हुसैन यांनी १-१ विकेट्स घेतल्या. कोलकाता नाईट रायडर्सने प्रथम नाणेफेक जिंकत चेन्नईला फलंदाजीसाठी पाचारण केलं. चेन्नईचा कर्णधार ऋतुराज गायकवाड पुन्हा एकदा अपयशी ठरला आणि ७ धावा करत बाद झाला. तर संजू सॅमसन व आयुष म्हात्रेच्या जोडीने चांगली फटकेबाजी संघाच्या मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. संजू सॅमसन ४८ धावांत बाद झाल्याने त्याचं अर्धशतक हुकलं. तर आयुष म्हात्रे १७ चेंडूत ६ चौकार व २ षटकारांसह ३८ धावा करत बाद झाला. यानंतर डेवाल्ड ब्रेविसने २९ चेंडूत धटपट ४१ धावांची खेळी केली. तर सर्फराझने २३ आणि शिवम दुबेने १३ धावांचं योगदान दिलं आणि संघाला २० षटकांत ५ बाद १९२ धावा केल्या.

# मॅराडोनाच्या मृत्यू प्रकरणात पुन्हा चौकशी सुरू होणार; पहिली सुनावणी रद्द झाली होती

■ मुंबई/वृत्तसंस्था

फुटबॉल दिग्गज डिएगो मॅराडोना यांच्या मृत्यू प्रकरणाची चौकशी मंगळवारपासून पुन्हा सुरू होत आहे. त्यांच्या वैद्यकीय पथकावर योग्य उपचार न केल्याचा आणि निष्काळजीपणा केल्याचा आरोप आहे.



मे 2025 मध्ये सुरू झालेला पहिला खटला त्यावेळी रद्द करण्यात आला होता, जेव्हा एका न्यायाधीशावर कोर्टात परवानगीशिवाय माहितीपट शूट केल्याचा आरोप लागला होता. आता नवीन न्यायाधीशांसमोर सुनावणी सुरू होईल. मॅराडोना यांना फुटबॉल इतिहासातील महान खेळाडूंपैकी एक मानले जाते. त्यांनी 1986 च्या विश्वचषकात अर्जेंटिनाला विजय मिळवून दिला होता आणि 'हँड ऑफ गॉड' गोलसाठीही ते ओळखले जातात. मॅराडोना यांचा 25 नोव्हेंबर 2020 रोजी वयाच्या 60 व्या वर्षी मृत्यू झाला होता. ते मेंदूतील रक्ताच्या गुठळीच्या शस्त्रक्रियेनंतर घरी बरे होत होते. शवविच्छेदनात हृदयविकाराचा झटका आणि फुफ्फुसात पाणी जमा होणे हे मृत्यूचे कारण सांगितले गेले.

या प्रकरणात मेडिकल टीमचे 7 सदस्य खटल्याचा सामना करत आहेत. त्यांच्यावर 'कल्पेबल होमिसाइड'चा गुन्हा दाखल आहे. दोषी आढळल्यास त्यांना 8 ते 25 वर्षांपर्यंत शिक्षा होऊ शकते. तपासात समोर आले की, टीमला मॅराडोनाच्या गंभीर स्थितीची माहिती होती, परंतु त्यांनी आवश्यक पावले उचलली नाहीत. मेडिकल तज्ञांनी त्यांच्या उपचारांना 'निष्काळजी आणि अपुरे' असे म्हटले. खटल्यात सुमारे 100 साक्षीदारांचे जबाब घेतले जातील, ज्यात त्यांच्या मुलींचाही समावेश आहे. ही सुनावणी जुलैपर्यंत चालू शकते. मॅराडोनाने फुटबॉल कारकिर्दीत 312 गोल केले. त्यांनी आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत 91 सामने खेळले, ज्यात 34 गोल केले. मॅराडोना बार्सिलोना, नेपोली, सेव्हिला, नेवेल्स ओल्ड बॉईज आणि बोका ज्युनियर्स यांसारख्या क्लबकडून खेळले आहेत. बार्सिलोनाकडून खेळताना त्यांनी 36 सामन्यांत 22 आणि नेपोलीसाठी 188 सामन्यांत 81 गोल केले. मॅराडोनाने कारकिर्दीत 11 स्पर्धा जिंकल्या आहेत. यात 1 वर्ल्ड कप विजेतेपद, एक UEFA कप विजेतेपद, एक नेशन्स लीग, एक FIFA वर्ल्ड यूथ चॅम्पियनशिप आणि 5 राष्ट्रीय कप जिंकले आहेत. मॅराडोनाला फिफा प्लेयर ऑफ द सेंच्युरीनेही सन्मानित करण्यात आले आहे. त्याने एकदा वर्ल्ड कप गोल्डन बॉल, एकदा बॅलन डी'ओर, दोनदा साऊथ अमेरिकन फुटबॉलर ऑफ द इयर आणि सहा वेळा नॅशनल लीग टॉप स्कोरर अवॉर्ड जिंकला आहे.

# व्यावसायिकता अंगवळणी नसल्याने PCB ने मुजरबानीला 2 वर्षांसाठी निलंबित केले

■ मुंबई/वृत्तसंस्था



झिम्बाब्वेचा वेगवान गोलंदाज ब्लेसिंग मुजरबानीवर पाकिस्तान सुपर लीग (PSL) ने 2 वर्षांची बंदी घातली. त्याने PSL फ्रँचायझीसोबत करार केलेला असूनही इंडियन प्रीमियर लीग (IPL) मध्ये खेळण्याचा निर्णय घेतला होता.

मुजरबानीला PSL संघ इस्लामाबाद युनायटेडने बदली खेळाडू म्हणून करारबद्ध केले होते. नंतर कोलकाता नाइट रायडर्स (KKR) कडून ऑफर मिळाल्यावर त्याने PSL मधून माघार घेतली. PSL ने म्हटले की, फ्रँचायझी क्रिकेटमध्ये पारदर्शकता आणि व्यावसायिकता आवश्यक आहे. आधीच केलेल्या करारानुसार दुसऱ्या लीगमध्ये सामील होणे नियमांच्या विरोधात आहे. लीगनुसार, अशा प्रकरणांकडे दुर्लक्ष केल्यास फ्रँचायझी आणि भागधारकांचा विश्वास कमी होतो. म्हणून 2 वर्षांची बंदी घालण्यात आली. मुजरबानीने IPL मध्ये 2 सामने खेळले आहेत. त्याने ईडन गार्डन्सवर सनरायझर्स हैदराबादविरुद्ध 4 बळी घेतले आहेत. यापूर्वी त्याने T20 विश्वचषकात आपल्या कामगिरीने प्रभावित केले आहे. मुजरबानी हा पहिला खेळाडू नाही, ज्याच्या विरोधात करार मोडल्याबद्दल कायदेशीर कारवाई झाली आहे. गेल्या वर्षी दक्षिण आफ्रिकेच्या कॉर्बिन बॉशने पाकिस्तानी लीगमध्ये पेशावर जालमीसोबत करार केला होता. नंतर बॉश एका जखमी खेळाडूच्या जागी मुंबई इंडियन्समध्ये सामील झाला होता. त्याला एका हंगामासाठी PSL मधून निलंबित करण्यात आले होते. बॉशने पाकिस्तानी बोर्डाची माफी मागितली होती आणि बोर्डाने त्याच्याकडून नुकसान भरपाईची मागणी केली होती. रहमानच्या जागी KKR मध्ये सामील झाला होता मुजरबानीला कोलकाता नाइट रायडर्सने बांगलादेशी वेगवान गोलंदाज मुस्तफिजुर रहमानच्या बदली म्हणून आपल्या संघात घेतले होते. BCCI च्या निर्देशांनंतर फ्रँचायझीने रहमानला रिलीज केले होते.

# 'फाइव्ह क्रिकेटर्स ऑफ द इयर'मध्ये भारताच्या चार खेळाडू

■ गुवाहाटी/वृत्तसंस्था

क्रिकेटमधील प्रतिष्ठित संदर्भग्रंथ 'विस्डेन क्रिकेटर्स' अल्मनॅकच्या ताज्या आवृत्तीत हिंदुस्थानच्या दीप्ती शर्मा हिला 'सर्वोत्कृष्ट महिला क्रिकेटर'चा सन्मान मिळाला आहे. पुरुष गटात हा मान ऑस्ट्रेलियाच्या मिचेल स्टार्कला मिळाला.

या प्रतिष्ठत अंकाची 163 वी आवृत्ती 15 एप्रिलला प्रकाशित होणार आहे. यंदा 'फाइव्ह क्रिकेटर्स ऑफ द इयर'मध्ये चार हिंदुस्थानी खेळाडूंना स्थान मिळाले आहे. यामध्ये टीम इंडियाचा कर्णधार शुभमन गिल, अष्टपैलू रवींद्र जाडेजा, यष्टिरक्षक फलंदाज ऋषभ पंत व वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराज यांचा समावेश आहे. इंग्लंडविरुद्ध 2-2 ने बरोबरीत सुटलेल्या




कसोटी मालिकेत या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली होती.

शुभमन गिलला उत्कृष्ट कामगिरीबद्दल विस्डेन ट्रॉफी प्रदान करण्यात आली. एजबस्टन कसोटीत त्याने 430 धावा करत संघाला विजय मिळवून दिला. तर अभिषेक शर्माला वर्षातील सर्वोत्तम टी-20 खेळाडू म्हणून गौरवण्यात आले. त्याने पॅलेंडर वर्षात 1000 धावा दोन धावा प्रतिचेंडूपेक्षा अधिक स्ट्राइक रेटने केल्या.

**दीप्तीचा वर्ल्ड कपमधील मोलाचा वाटा**

दीप्ती शर्मा हिने हिंदुस्थानच्या जगज्जेतेपदात महत्त्वाची भूमिका बजावली. संपूर्ण स्पर्धेत तिने 215 धावा आणि 22 विकेट्स घेतल्या. अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध 58 धावा आणि 5/39 अशी कामगिरी करत तिने संघाला विजय मिळवून दिला.

**स्टार्कची दमदार कामगिरी**

मिचेल स्टार्कने 2025 मध्ये शानदार कामगिरी करत 11 कसोटी सामन्यांत 55 विकेट्स घेतल्या. वेस्ट इंडीजविरुद्ध 6/9 ही त्याची सर्वोत्तम कामगिरी ठरली. तसेच 'अॅशेस 2025-26'च्या मालिकेतील पहिल्या दोन कसोटी सामन्यांत 18 विकेट्स घेत त्याने मालिकेत एकूण 31 विकेट घेतल्या. तसेच इंग्लंडच्या हसीब हमीद यालाही 'फाइव्ह क्रिकेटर्स ऑफ द इयर'मध्ये स्थान मिळाले. त्याने नॉटिंगहॅमशायरला काउंटी चॅम्पियनशिप जिंकून देताना 1258 धावा केल्या, ज्यामध्ये चार शतके आणि दोन द्विशतके होती.

**1864 पासून प्रकाशन**

'विस्डेन क्रिकेटर्स' अल्मनॅक हे जगप्रसिद्ध क्रीडा संदर्भ पुस्तक असून 1864 पासून दरवर्षी ब्रिटनमध्ये प्रकाशित केले जाते. याची स्थापना जॉन विस्डेन यांनी केली. क्रिकेटमधील अधिकृत नोंदी, स्कोअरकार्ड्स आणि 'क्रिकेटर्स ऑफ द इयर' पुरस्कार यांचा यात समावेश असतो.

# तुरुंगात राहिले विक्रम भट्ट:देवाकडे म्हणायचे- मला इथे मरायचे नाही, 30 कोटींच्या फसवणूक प्रकरणात तुरुंगवास

30 कोटी रुपयांच्या फसवणुकीच्या आरोपाखाली डिसेंबर ते फेब्रुवारीपर्यंत तुरुंगात राहिलेले चित्रपट निर्माता विक्रम भट्ट यांनी तुरुंगातील वेदनादायक दिवसांची आठवण करून दिली आहे. चित्रपट निर्मात्यांच्या मते, त्यांना कडाक्याच्या थंडीमुळे तीव्र ताप आला होता, ते वेदनेने विव्हळत होते, परंतु तेथे उपस्थित पोलिसांनी त्यांना डॉक्टरांकडे नेले नाही. तुरुंगातील कैद्यांनीच मदत केली. अशा परिस्थितीत ते देवाला सतत सांगत होते की त्यांना तुरुंगात मरायचे नाही.



विक्रम भट्ट यांनी तुरुंगातील दिवसांची आठवण करून अधिकृत सोशल मीडियावरून लिहिले आहे. उदयपूर तुरुंगात माझ्या अटकेनंतर सुमारे तीन आठवड्यांनी, जानेवारीच्या कडाक्याच्या थंडीत, एका रात्री मी बॅरेक नंबर 10 मध्ये तीव्र तापासह थरथरत उठलो. चार ब्लँकेट पांघरल्यानंतरही असे वाटत होते की शरीरावर काहीच नाही. जवळ झोपलेल्या कैद्यांनी माझ्यासाठी आणखी ब्लँकेट गोळा केले. मी पॅरासिटामॉल घेतली आणि विचार केला की बरा होईन. पण तसे झाले नाही. दुसऱ्या सकाळी मी तुरुंगातील रुग्णालयात गेलो. तिथे थर्मामीटरही नव्हते. त्यांनी ऑक्सिजन तपासला आणि सांगितले की सर्व ठीक आहे.

पुढे चित्रपट निर्मात्याने लिहिले, 'मी म्हणालो, हा विनोद आहे का? मला ॲक्सियल स्पॉन्डिलोआर्थरायटिस आहे, जो एक ऑटोइम्यून आजार आहे, आणि माझ्यासाठी तीव्र ताप धोकादायक ठरू शकतो. शेवटी डॉक्टरांनी मला बाहेर रुग्णालयात घेऊन जाण्यासाठी एक चिठ्ठी लिहून दिली. पण कोणी आलेच नाही. आधी पोलीस एका VIP च्या सुरक्षेत व्यस्त होते. नंतर एका आदिवासी जत्रेत. दिवसेंदिवस मी बॅरेकमध्ये वाट पाहत राहिलो. माझे दिवस वेदनेत जात होते, आणि रात्री तापात.'

पुढे भावूक होऊन चित्रपट निर्मात्याने लिहिले, 'एक वेळ अशी आली जेव्हा मला समजले की मी कुठेही जात नाहीये. मग मी तेच केले जे मी करू शकत होतो. मी तेल आणि मीठ खाणे बंद केले, शक्य तितके पाणी प्यायलो, आणि बॅरेकमध्ये लावलेल्या देवीच्या एका मोठ्या चित्रासमोर बसलो. आणि मी प्रार्थना केली. मी म्हणालो, "जर तुम्ही असाल, जर माझ्या प्रार्थनांना कधी काही अर्थ असेल, तर मला एक चमत्कार दाखवा. मला इथे मरायचे नाहीये. माझ्या मुलांना माझी गरज आहे. माझ्या पत्नीला माझी गरज आहे. माझ्या 90 वर्षांच्या वडिलांना माझी गरज आहे."'

शेवटी, चित्रपट निर्मात्याने लिहिले, 'मी दररोज प्रार्थना करत राहिलो. आणि हळूहळू, काहीतरी बदलू लागले. ताप कमी होऊ लागला. वेदना हळूहळू कमी होऊ लागल्या. दिवसेंदिवस मी बरा होऊ लागलो. एका सकाळी मी देवीकडे पाहिले आणि फक्त इतकेच म्हटले, "माझे जीवन परत दिल्याबद्दल धन्यवाद."'

आपल्या पोस्टमध्ये विक्रम भट्ट यांनी कारागृह प्रशासनावर निष्काळजीपणाचे आरोपही केले आहेत. त्यांनी लिहिले आहे की, तक्रार केल्यानंतर 15 दिवसांनी पोलीस त्यांना रुग्णालयात घेऊन जाण्यासाठी आले होते, पण तोपर्यंत ते बरे झाले होते. यावर त्यांनी पोलिसांना सांगितले होते, "जनाब, तुम्ही सुमारे 15 दिवस उशिरा आला आहात. कदाचित तुम्ही माझ्या भूताला भेटायला आला आहात."

जेव्हा त्यांनी अधिकाऱ्याला विचारले की जर ही आपत्कालीन परिस्थिती असती तर ते काय केले असते, तेव्हा उत्तर मिळाले, "ओह, तेव्हा आम्ही तुम्हाला तुरुंग रक्षकांसोबत पाठवले असते." यावर विक्रम लिहितात, 'ते मला आधीही पाठवू शकले असते. कदाचित त्यांनी पाठवले नाही. किंवा कदाचित देवाला मला आधी काहीतरी शिकवायचे होते. म्हणूनच जेव्हा लोक म्हणतात की देव नाही, तेव्हा मी वाद घालत नाही. मी फक्त हसतो. कारण काही चमत्कार फक्त त्यालाच दिसतात, ज्याला त्यांची सर्वात जास्त गरज असते.' राजस्थानच्या इंदिरा ग्रुप ऑफ कंपनीजचे मालक डॉ. अजय मुर्डिया यांनी 17 नोव्हेंबर रोजी विक्रम भट्ट यांच्यासह 8 लोकांविरुद्ध 30 कोटी रुपयांच्या फसवणुकीची एफआयआर उदयपूरमध्ये दाखल केली होती.


## फिनालेपूर्वी बिग बॉसचा सदस्यांना धक्का, पार पडलं मिड-वीक एलिमिनेशन

बिग बॉस मराठीचं सहावं पर्व आता अंतिम टप्यात येऊन पोहोचलं असून १९ एप्रिल रोजी बिग बॉस मराठीच्या सहाव्या पर्वाचा अंतिम सोहळा पार पडणार आहे. बिग बॉसच्या घरात कलाकार, सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्स सहभागी झाले होते. त्यातील काही एलिमिनेट असून आता बिग बॉसमध्ये सहा स्पर्धक उरले आहेत. पहिल्या आणि दुसऱ्या आठवड्यानंतर बिग बॉसच्या घरात समीकरणं बदलायला लागली. सदस्यांमध्ये वाद झाले, त्यावरून रितेशनं सदस्यांना सुनावलं. काहींनी त्यावरून आपल्या खेळात बदल केला आणि अंतिम टप्प्यापर्यंत येऊन पोहोचले. अशातच आता बिग बॉसमध्ये 'मिड-वीक' एव्हिक्शन झालं आहे.मिड-वीक एव्हिक्शनसाठी बिग बॉस मुख्य प्रवेशद्वार उघडतात.' बिग बॉस मराठी ६ ' मध्ये तन्वी कोलते, अनुश्री माने, दीपाली सय्यद , रेवा कौरासे , विशाल कोटियन आणि राकेश बापट हे 'टॉप ६' सदस्य होते. आता मिड-वीक एलिमिनेशनमध्ये सहा सदस्यांपैकी रेवा कौरासे एलिमिनेट झाली असून बिग बॉसच्या शेवटच्या आठवड्यात रेवाचा प्रवास संपला आहेदरम्यान, गेल्या आठवड्यात बिग बॉसमधून राखी सावंतचं एलिमिनेशन झालं. राखी बिग बॉसमध्ये वाईल्ड कार्ड एन्ट्री घेऊन आलेली. बिग बॉसच्या घरातील सदस्यांचा गेम फारसा दिसत नव्हता. त्यामुळे राखीची बिग बॉसमध्ये एन्ट्री झाली. राखीनं येताच बिग बॉसच्या घरात राडा घालण्यास सुरुवात केली. प्रत्येक स्पर्धकामध्ये राखीनं भांडणं लावली. त्यामुळे बिग बॉसमध्ये वाद झालेलाही पाहायला मिळाला. पुढे, शेवटचा आठवडा सुरू होण्यापूर्वी बिग बॉसने खेळात एक नवीन वळण आणलं. तन्वी कोलतेनं राकेश बापट आणि अनुश्री मानेवर मात करत 'तिकीट टू फिनाले' पटकावून अंतिम फेरीत आपलं स्थान निश्चित केलं.

## ऐश्वर्यासारखी दिसते या बॉलिवूड अभिनेत्याची मुलगी

बॉलिवूड अभिनेता नवाजुद्दीन सिद्दीकीची मुलगी शोरा सिद्दीकी सध्या चांगलीच चर्चेत आहे. नुकताच तिचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर समोर आला असून, त्यामध्ये ती वडिलांसोबत दिसत आहे. या व्हिडिओत तिचं व्यक्तिमत्त्व आणि सौंदर्य पाहून नेटकऱ्यांनी तिच्यावर कौतुकाचा वर्षाव केला आहे. अनेक जण तिच्या बॉलिवूड पदार्पणाची आतुरतेने वाट पाहत आहेत.माध्यमांमधील चर्चेनुसार, शोरा सिद्दीकी लवकरच गायक अरिजीत सिंह यांच्या दिग्दर्शकीय पदार्पणाच्या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये एन्ट्री करू शकते. जरी याबाबत अधिकृत घोषणा झालेली नसली तरी या बातमीमुळे चाहत्यांची उत्सुकता वाढली आहे.नवाजुद्दीन सिद्दीकीने 2009 साली आलिया सिद्दीकी यांच्याशी विवाह केला. या दाम्पत्याला दोन मुले आहेत. एक शोरा आणि मुलगा यानी. डिसेंबर 2025 मध्ये शोरा 17 वर्षांची झाली आहे. ती अनेकदा मुंबईतील फिल्म इव्हेंट्समध्ये वडिलांसोबत दिसते. सध्या ती लंडनमध्ये अभिनयाचे शिक्षण घेत आहे.






गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये नवाजुद्दीनने मुलीचा ऑडिशन व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला होता. या व्हिडिओमध्ये शोरा इंग्रजी संवाद आत्मविश्वासाने सादर करताना दिसली. हा व्हिडिओ इंटरनेटवर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला. या पोस्टसोबत नवाजुद्दीनने कॅप्शनमध्ये "Can I come in... Scene One" असे लिहिले होते. तिचा व्हिडिओ पाहून नेटकऱ्यांनी तिच्या आत्मविश्वासाचं आणि नैसर्गिक अभिनयाचं भरभरून कौतुक केलं.कमेंट सेक्शनमध्ये अनेकांनी शोरा "खूप कॉन्फिडंट" आणि "नॅचरल ॲक्टर" असल्याचं म्हटलं. काहींनी तर तिची तुलना ऐश्वर्या राय बच्चनशी करत तिच्या सौंदर्याचंही कौतुक केलं. शोरा सिद्दीकीने लंडनमधील वेस्ट एंड स्टेज, थिएटर समर स्कूलमध्ये 'ब्यूटी अँड द बीस्ट' या म्युझिकलमध्ये अभिनय केला आहे. त्यामुळे तिला लहान वयातच आंतरराष्ट्रीय स्तरावर अभिनयाचा अनुभव मिळाला आहे. स्वतः नवाजुद्दीन सिद्दीकीने दिल्लीतील नॅशनल स्कूल ऑफ ड्रामामधून अभिनयाचे शिक्षण घेतले असून, आपल्या मुलीला अशा प्रतिष्ठित संस्थेत प्रशिक्षण मिळत असल्याचा त्याला अभिमान आहे.दरम्यान, शोरा सिद्दीकीचा आत्मविश्वास, तिची मेहनत आणि अभिनयावरील गंभीरता पाहता ती भविष्यात एक दमदार अभिनेत्री म्हणून समोर येऊ शकते. तिच्या सौंदर्यासोबतच तिच्या अभिनयाचाही प्रेक्षकांना लवकरच अनुभव घेता येईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे

## सतत दिसत राहण्याची गरज वाटत नाही : सोनाली कुलकर्णी

स्वतःचं उत्तम मार्केटिंग करता येणं, चांगली कथा अन् भूमिका असेल, तर कलाकार महणून न बांबता आणखी चार पावलं पुढे टाकून तो प्रोजेक्ट साकारला जावा आणि त्यावर काम करणाऱ्यांची उत्तम भट्टी जमावी, यासाठी प्रयत्न करणारं नाव म्हणजे अभिनेत्री सोनाली कुलकर्णी , सहकलाकारांपासून निर्माता-दिग्दर्शकांपर्यंत सगळे तिच्या या स्वभावाचं कौतुक करतात. 'तिथी' सारख्या सिनेमात 'नो मेकअप' साकारणं असो, वयानुरूप स्वतःला स्वीकारून कोणतीही ब्यूटी ट्रीटमेंट न घेण्याचा निर्णय असो, नृत्यावर आधारित सिनेमा मिळाला नाही तर खंत नाही, असं स्पष्टपणे सांगणं असो वा प्रदर्शित होऊ न शकलेल्या सिनेमाला वाट दिसाची म्हणून आशावादी असण्याबद्दल सोनाली भरभरून बोलते.'जिथे कमी तिथे आम्ही, ही माझी भूमिका असते. सिनेमाच्या प्रक्रियेत कुठे आपली गरज आहे आणि नाही, हे ओळखता यायला हवं. फक्त अभिनेत्री असण्यापलीकडे जात मी अनेक गोष्टी केल्यात. त्यात मला काही वावर्ग किंवा त्याचं कौतुक करावं, असंही काही वाटत नाही. सिनेमात काम करणाऱ्या प्रत्येकाला असं वाटलं, की आपण अमुक गोष्टीपुरते मर्यादित नाही, तरच चांगले सिनेमे घडतील. मी सिनेमाबद्दल पॅशनेट असेल, तरच तो स्वीकारते आणि झोकून देते,' असे सोनाली सांगते. सिनेमांच्या निवडीत सतत वेगळं करत राहण्याचा ताण येतो का, या मुद्दावर ती म्हणते, 'ताण येण्यापेक्षा मला ती गरज वाटते. मला तोचतोचपणा आणणाऱ्या गोष्टीचा कंटाळा येतो. वर्षातून एक सिनेमाही बास, या टप्प्यावर मी आता आहे. ती कलाकृती काही सांगणारी, मला समाधान देणारी असावी, मला सतत दिसत राहण्याची गरज नाही. पैसे कमावण्याची इतर साधनं आहेत. लग्न झाल्यावर माझा वेळ मी वेगळा काढत असेल, तर ती गोष्ट मला भावली पाहिजे, ही कलाकार म्हणून माझी मुलभूत गरज आहे. मी खरंच वेगळं करतेय,हे सांगता आलं पाहिजे.दरवर्षी माझ्या किंवा नवऱ्याच्या वाढदिवसाला आम्ही नवा देश शोधून फिरण्याचा बेत आखतो. गेल्या वर्षी माईमारा किर्गिस्तान फिरून आलो.कन्टेंटचा सध्या भडिमार आहे. या सगळ्या गर्दीत आपण काही केलं नाही, तर वेगळे दिसू, असंही करून चालत नाही. तुम्हाला आवडणारा आशय आहे का, हा मुद्दा महत्त्वाचा आणि मला गढीत हरवायचंही नाहीय.काही गोष्टी आपल्या नियंत्रणापलीकडे असतात. खूप अपेक्षांपलीकडची गुंतवणूक त्यात आहे. 'रावसाहेब' असो वा हा सिनेमा... योग्य वेळी तो प्रदर्शित होईल, त्याचं श्रेय त्यासाठी काम करणाऱ्या सर्वांना मिळो, अशी अपेक्षा आहे.जो सिनेमा केला, तो फारसा चालला नाही. त्यावर अनेक गोष्टी अवलंबून असतात. ओटीटीवर काम करण्यासाठी मी होकार द्यावा, असे अजून फारसं रंजक असं काही माझ्याकडे आलेलं नाही. कुटुंब वाढवण्यासाठी आम्ही योग्य वेळी निर्णय घेऊ. त्याबाबत आमच्या घरच्यांनीही कधी दबाव टाकलेला नाही. मी खूप उत्साही, तर माझा नवरा शांतपणे सगळ्या गोष्टी हाताळू शकणारा आहे. लग्नानंतर मी दुबईत काही मिस करत असेन, तर माणसं... मला भरपूर माणसांत राहायची सवय आहे. मात्र, दुबईतून घरी येणं फार अवघड नाही



दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# उष्णतेच्या लाटांपासून संरक्षणासाठी राज्य शासनाकडून तीन व्यापक एसओपी जारी

**जनसंचलन/ बुलढाणा**

राज्य शासनाने राज्य उष्णता कृती आराखडा आणि भारतीय हवामान विभागाच्या () रंग-कोडेड उष्णता सतर्कतांच्या अनुषंगाने उष्णतेच्या लाटांपासून नागरिकांचे, विशेषतः असुरक्षित घटकांचे संरक्षण करण्यासाठी तीन व्यापक मानक कार्यपद्धती () जारी केल्या आहेत. उष्णता-संबंधित आजार व मृत्यू कमी करण्यासाठी या उपाययोजना उपयुक्त ठरणार असून, विशेषतः अनौपचारिक कामगार, खाण कामगार आणि कमी उत्पन्न गटांना मोठा दिलासा मिळणार असल्याचा विश्वास आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी व्यक्त केला. या एसओपींचा मुख्य भर १५ उच्च-उष्णता-जोखमीच्या जिल्ह्यातील बाहेरील अनौपचारिक कामगार, चंद्रपूरमधील कोळसा खाण कामगार तसेच उष्णता-प्रतिरोधक गृहनिर्माण आणि वसाहतींवर आहे. लातूर, अमरावती, यवतमाळ, वाशिम, अकोला, बुलडाणा, नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, जळगाव, नंदुरबार, धुळे आणि नांदेड हे जिल्हे यामध्ये समाविष्ट आहेत. पहिल्या एसओपीमध्ये रस्त्यावरील विक्रेते, बांधकाम मजूर, वाहतूक पोलीस, स्वच्छता कर्मचारी, डिलिव्हरी कामगार, रिक्षाचालक आदी बाहेर काम करणाऱ्या घटकांसाठी मार्गदर्शन करण्यात आले आहे. आयएमडीच्या पिवळ्या, केशरी आणि लाल सतर्कतांनुसार कामाचे वेळापत्रक बदलणे, पाण्याचे ब्रेक, पाणी बूथ, ओआरएस वितरण, सावली व्यवस्था आणि आरोग्य सुविधा मजबूत करणे यासारख्या उपाययोजना करण्यात येणार आहेत.

दुसरी एसओपी चंद्रपूर जिल्ह्यातील कोळसा खाणींमध्ये काम करणाऱ्या कामगारांसाठी असून, उष्णता ताण व्यवस्थापनावर लक्ष केंद्रित करते. यामध्ये थंड विश्रांती केंद्रे, पाणी पुरवठा, वायुवीजन, कामाचे नियोजन, जॉब रोटेशन, उष्णता आजार ओळख प्रशिक्षण आणि महिला कामगारांसाठी विशेष सुविधा यांचा समावेश आहे. तिसऱ्या एसओपीमध्ये उष्णता-प्रतिरोधक गृहनिर्माणाचा समावेश असून, तत्काळ, मध्यम व दीर्घ मुदतीच्या उपाययोजनांद्वारे घरांची थर्मल सुधारणा, कूल रूफ, हरित क्षेत्रे आणि हवामान-संवेदनशील नियोजन यावर भर देण्यात आला आहे. उच्च-उष्णता-जोखमीच्या जिल्ह्यांमध्ये उष्णता-प्रतिरोधक गृहनिर्माण व वसाहती मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सल्ला आहे. या एसओपी तात्काळ, मध्यम-मुदती (१-३ वर्षे) आणि दीर्घ-मुदती अशा तीन-स्तरीय उपाय योजनावर आधारित आहे: तात्काळ उपाययोजना मध्ये: उष्णता जोखीम नकाशा, असुरक्षित गटांचे लक्ष्यीकरण, जनजागृती, थंडी केंद्रे, घरांची कमी खर्चाची थर्मल सुधारणा (रिफ्लेक्टिव्ह छप्पर, सावली, वेंटिलेशन). मध्यम-मुदती उपाय: पीएमएवाय, गृहनिर्माण योजना, बिल्डिंग बाय-लॉज आणि मास्टर प्लॅनमध्ये उष्णता-प्रतिरोधक डिझाइन (कूल रूफ, ग्रीन स्पेस) समाविष्ट करणे. दीर्घ-मुदती उपाय: स्टेट बिल्डिंग कोड, क्लायमेट-सेन्सिटिव्ह झोनिंग आणि सर्वांसाठी समान तापमान सुविधा यांचा समावेश आहे. या तीनही एसओपीमध्ये विभागीय समन्वय, आरोग्य केंद्रे आणि कामगारांच्या अभिप्रायावर आधारित नियमित पुनरावलोकन तसेच अनौपचारिक कामगारांच्या प्रतिनिधित्वावर भर दिला आहे. जिल्हा नियंत्रण कक्ष (१०७७), रुग्णवाहिका (१०८), पोलीस हेल्पलाइन (११२/१००) आणि इतर महत्त्वाचे संपर्क क्रमांकही प्रसारित करण्यात आले आहेत. या एसओपींची जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, महापालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, नगररचना विभाग, म्हाडा, सिडको, स्थानिक स्वराज्य संस्था आदी प्रमुख विभागांच्या माध्यमातून अंमलबजावणी करण्यात येणार आहे. देशातील दहा प्रमुख उष्ण राज्यांमध्ये महाराष्ट्र राज्याचाही समावेश आहे. वातावरणातील बदलांमुळे तापमान सातत्याने वाढत असून अनेक भागात तापमान ४७ ते ४९ अंश सेल्सियसपर्यंत पोहोचत आहे. राज्यात वाढत्या उष्णतेमुळे दक्षता घेण्याच्या सूचना राज्यातील सर्व जिल्हाधिकारी आणि आपत्ती व्यवस्थापन विभागांना देण्यात आल्या आहेत. वाढत्या उष्णतेच्या अनुषंगाने जनजागृतीसाठी विशेष मोहिमाही राबवण्यात येणार असून या एसओपींची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आवाहन आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी केले आहे. वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सुरक्षेसाठी राज्य शासनाने सविस्तर तीन स्वतंत्र मानक कार्यपद्धती (एसओपी) तयार करण्यासाठी विशेष प्रयत्न केले असल्याची माहिती मदत, पुनर्वसन आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या प्रधान सचिव विनिता सिंगल यांनी दिली. सकाळी ११ ते दुपारी ४ या तीव्र उन्हाच्या कालावधीत बाहेर पडणाऱ्या नागरिकांनी कोणती काळजी घ्यावी याबाबत या एसओपीमध्ये मार्गदर्शन करण्यात आले आहे.

# गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ संपन्न.

**बुलढाणा**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीचे औचित्य साधून स्वराज्य करिअर अकॅडमी बुलढाणा च्या वतीने आयोजित करण्यात आलेला गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ खूप उत्साहात संपन्न झाला असून सदर कार्यक्रमा मध्ये विविध विभागात सरकारी नोकरी वर लागलेले विद्यार्थी व त्यांचे पालक तसेच देशाचे पंतप्रधान मा. श्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या स्पर्धा परीक्षा लेखी पेपर मधील विजेत्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. स्वराज्य करिअर अकॅडमी बुलढाणा ही बुलडाणा प्राईड बिल्डिंग येथे दुसऱ्या मजल्यावर मागील वर्षभरापासून क्लासेस, हॉस्टेल, मेस, अभ्यासिका चालवत आहे. सदर कार्यक्रमाची सुरुवात ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. याप्रसंगी ज्येष्ठ समाजसेवक श्री विजय काळे साहेब, श्री दादाराव पगारे साहेब, श्री सुशिल इंगळे साहेब, श्री विठोबा साठे साहेब, श्री अनिल पालकर




साहेब, स्वराज्य करिअर अकॅडमी बुलढाणा चे संचालक श्री समाधान टेकाळे सर, सूत्र संचालन करताना श्री प्रा. ज्ञानेश्वर बावणे सर,सर्व यशस्वी विद्यार्थी विद्यार्थिनी, पालक व इतर सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये सरकारी नोकरीवर लागलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला यामध्ये

रणजीत राठोड - पॅरा कमांडो
राम कोथळकर - पॅरा कमांडो
संकेत इंगळे - पॅरा कमांडो
आदित्य काळे - पॅरा कमांडो
चेतन गवळी - बुलढाणा पोलीस
ऋषिकेश धावडे -
कोमल साठे - बुलढाणा पोलीस

यांच्या व्यतिरिक्त घेतलेल्या लेखी परीक्षेत ज्या विद्यार्थ्यांनी क्रमांक मिळवला त्या विद्यार्थ्यांना रोख रक्कम बक्षीस देऊन सत्कार करण्यात आला.

मुलींमध्ये विजेत्या विद्यार्थिनी:::
प्रथम क्रमांक - अश्विनी वाडेकर
द्वितीय क्रमांक (कॉमन) - अपूर्वा पालकर
द्वितीय क्रमांक - (कॉमन) - स्नेहा जाधव
तृतीय क्रमांक - कोमल साठे तसेच
मुलांमध्ये विजेते विद्यार्थी:::::
१)प्रथम क्रमांक - हर्षल शेळके
२)द्वितीय क्रमांक - आदित्य काळे
३)तृतीय क्रमांक - पवन घुले

अशा प्रकारे संपूर्ण कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

# अस्थिविसर्जन कार्यक्रमात शाळेला मदत व देहदानाचाही संकल्प..

**जनसंचलन/बुलढाणा**

मृत्यू हे जीवनाचे अंतिम सत्य आहे. मृत्यूनंतर शरीराची राख होते.मात्र मृत्यूनंतर अवयव रुपी ऊरावे व इतरांच्या कामी हा देह पडावा या उदात्त हेतूने केळवद ता.चिखली येथील नंदू आप्पा बोरबळे यांनी आईच्या अस्थि विसर्जन कार्यक्रमातच देहदानाचा संकल्प केला. केवळ देहदानाचा संकल्पच केला नाही तर गावातील शाळेला भरघोस अशी आर्थिक मदतही दिली. आईच्या अस्थी विसर्जन कार्यक्रमातील आप्पाजींचे सामाजिकपण सध्या चर्चेचा विषय झाले आहे. आईचे निधन हे प्रत्येकाच्या आयुष्यातील दुःखद घटना,प्रत्येकाच्या जीवनातील सुखदुःखाचा साक्षीदार म्हणजे आई. नंदू आप्पा बोरबळे यांच्या मातोश्री राधाबाई बोरबळे यांचे वृद्धपकाळाने निधन झाले. त्यांच्या अस्थि विसर्जनाचा कार्यक्रम १५ एप्रिल रोजी केळवद येथे होता. या कार्यक्रमात कर्मकांडाला फारसा वाव न देता थोडक्यात विधी त्यांनी आटोपले. नसा नसात भरलेले सामाजिकपण आणि प्रवाहाच्या बाहेर जाऊन काहीतरी करण्याची वृत्ती नंदू आप्पा यांनी जोपासली आहे. विषारी सापाला हात लावणे म्हणजे मृत्यूला हात लावणे.मोठी जोखीम, आप्पाजी हे काम दिवसाआड करतात. सर्पमित्र असल्याने अनेक विषारी साप पकडून त्यांना जंगलात सोडून देतात. गोरगरीब असेल, गावातील कुणीही असेल हा सेवाभाव त्यांनी कितीतरी वर्षापासून जोपासला आहे.दुसऱ्यासाठी काहीतरी करण्याची वृत्ती माणसाला गप्प बसू देत नाही. आईचे निधन झाले या दुःखद प्रसंगातही त्यांनी आपल्या सामाजिकतेचा परिचय देत गावातील संभाजी विद्यालयास अकरा हजार रुपये देणगी दिली. तर आपल्या शरीराचा उपयोग वैद्यकीय क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी व्हावा या हेतूने देहदानाचा संकल्प सोडला. यावेळी संभाजी विद्यालयाचे मुख्याध्यापक सुखराज शिंदे व शिक्षक गजानन धोंडगे यांच्याकडे निधी सुपूर्त करण्यात आला. शरद कला महाविद्यालयाचे प्राचार्य विष्णुपंत पाटील, हृदयरोग तज्ञ डॉ. गजेंद्र निकम,पत्रकार गणेश निकम , पत्रकार राम हिंगे, अमोल बोरबळे,शिवसेना नेते नंदू भाऊ कराळे , माजी सभापती जगन नाना,नारायण वाणी,पवन महाराज, पवार,नंदिनी बोरबळे आदीं उपस्थिती होते.

# करवंड येथे छत्रपती शिवाजी महाराज व महाराणी गुणवंताबाई विवाह सोहळा उत्साहात संपन्न...

**जनसंचलन/बुलढाणा**

स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज आणि महाराणी गुणवंताबाई साहेब यांच्या ऐतिहासिक विवाह सोहळ्याला ३७० वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने, करवंड येथे प्रथमच ऐतिहासिक करवंड महोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याच्या माध्यमातून इतिहासाला उजाळा मिळण्यासोबतच, किल्ले व बुरुजाचे संवर्धनासाठी आणि भव्य स्मारक उभारण्यासाठी राज्य शासनाच्या माध्यमातून सर्वतोपरी मदत केली जाईल, अशी ग्वाही सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी दिली.

सांस्कृतिक कार्य विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय व करवंड महोत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने ऐतिहासिक करवंड महोत्सवाचे आयोजन चिखली तालुक्यातल करवंड येथे करण्यात आले होते. यावेळी विधान परिषद आमदार धिरज लिंगाडे, विधानसभा आमदार श्वेता महाले, संजय गायकवाड, सिद्धार्थ खरात, मनोज यदे, मुख्यमंत्री यांचे स्वीय सहायक विद्याधर महाले, अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, राजेंद्र पोळ, उपविभागीय अधिकारी शरद पाटील, अनिकेत निंबाळकर आयोजन समितीचे अध्यक्ष अरविंद देशमुख तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी, ग्रामस्थ आदी उपस्थित होते. १५ एप्रिल १६५७ रोजी झालेल्या या ऐतिहासिक विवाहाचे स्मरण म्हणून आयोजित या कार्यक्रमात बोलताना शिवेंद्रराजे भोसले म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज आणि महाराणी गुणवंताबाई यांचा विवाह सोहळा केवळ एक कौटुंबिक प्रसंग नसून स्वराज्याच्या उभारणीतील एक महत्त्वाचा दुवा आहे. या भूमीला ऐतिहासिक महत्त्व असून, येथील पडझड झालेल्या बुरुजांचे पुनरुज्जीवन करणे आणि राजवाड्याचे जतन करणे ही काळाची गरज आहे. करवंड येथील ऐतिहासिक वास्तूंचे जतन करण्यासाठी सांस्कृतिक कार्य मंत्री आणि मुख्यमंत्री यांच्या माध्यमातून विशेष प्रकल्प मंजूर करण्यात येईल. यामध्ये प्रामुख्याने महाराणी गुणवंताबाई यांचा भव्य पुतळा उभारणे, ऐतिहासिक राजवाड्याची डागडुजी करणे आणि पर्यटनाच्या दृष्टीने या परिसराचा विकास करणे, या कामांना प्राधान्य दिला जाईल, असेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.



हा महोत्सव आणि स्मारकाचे काम केवळ शासन किंवा प्रशासनाचे नसून, यामध्ये स्थानिक ग्रामस्थ आणि सर्व शिवप्रेमींचा सहभाग तितकाच महत्त्वाचा आहे. तांत्रिक अडचणी आणि प्रशासकीय परवानग्या मिळवण्यासाठी ग्रामपंचायत व स्थानिकांनी सहकार्य करावे, जेणेकरून पुढच्या वर्षी हा सोहळा अधिक भव्य स्वरूपात साजरा करता येईल, असे आवाहनही सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवद्रराजे भोसले यांनी याप्रसंगी केले. आमदार श्वेता महाले यांनी मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, करवंड महोत्सवाचा प्रस्ताव कृती समितीने मांडल्यानंतर सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी तात्काळ पुढाकार घेतला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष प्रयत्नांमुळेच हा सोहळा इतक्या भव्य स्वरूपात साकार झाला आहे. या प्रसंगी परिसरातील वाहतुकीच्या समस्यांकडेही मंत्र्यांचे लक्ष वेधण्यात आले. चिखली ते बुलढाणा दरम्यान मोठ्या प्रमाणावर होणारी वाहतूक कोंडी आणि पूर्वी २० मिनिटांत होणाऱ्या प्रवासाला आता लागणारा सव्वा तासाचा वेळ, यामुळे प्रवाशांचे हाल होत आहेत. ही कोंडी फोडण्यासाठी आणि रस्ते वाहतूक सुरळीत करण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची विनंती यावेळी करण्यात आली.

## मेहकर येथील शासकीय मुलींच्या वसतिगृहात सामाजिक समता सप्ताह उत्साहात संपन्न...

**जनसंचलन/बुलढाणा**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, बुलढाणा अंतर्गत कार्यरत असलेल्या मागासवर्गीय मुलींच्या शासकीय वसतिगृह, मेहकर येथे ८ एप्रिल ते १४ एप्रिल या कालावधीत सामाजिक समता सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या सप्ताहाचे औचित्य साधून वसतिगृहाच्या नामफलकाचे अनावरण करण्यात आले असून, आता हे वसतिगृह क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय मुलींचे वसतिगृह, मेहकर या नावाने ओळखले जाणार आहे.

सप्ताहाची सुरुवात ८ एप्रिल रोजी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेच्या वाचनाने करण्यात आली. यावेळी विद्यार्थिनींसाठी विशेष भाषण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नेहा वानखेडे (बी.फार्म) यांनी तर कार्यक्रमाचे अध्यक्षपद गृहपाल संध्या देखणे यांनी भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून सलोनी सदाशिव (बी.फार्म) यांनी संविधानावर सखोल मार्गदर्शन केले. नेहा इंगळे, संघमित्रा वानखेडे, आणि साक्षी ताजने या विद्यार्थिनींनी आपल्या भाषणातून संविधानाचे महत्त्व विषद केले. ११ एप्रिल रोजी महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्त १२ एप्रिल रोजी महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर आधारित निबंध स्पर्धा आणि वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. विद्यार्थिनींनी या स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवून महापुरुषांच्या विचारांना उजाळा दिला.




१४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी विद्यार्थिनींनी डॉ. बाबासाहेबांच्या जीवनावर आधारित गीते गायली आणि आपले मनोगत व्यक्त केले. या सप्ताहाच्या यशस्वीतेसाठी वसतिगृहातील सर्व विद्यार्थिनींसह बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचा समारोप प्र. गृहपाल संध्या देखणे यांनी सर्वांचे आभार मानून केला. सामाजिक समतेचा संदेश देणाऱ्या या सप्ताहामुळे वसतिगृहात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते.

## लसीकरणाबाबत खामगाव येथे जनजागृती कार्यक्रम




**जनसंचलन/बुलढाणा**

खामगाव येथील जिल्हा परिषद उच्च माध्यमिक शाळेत विद्यार्थिनी, शिक्षक व पालकांसाठी लसीकरणाविषयी समुपदेशन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमात वैद्यकीय अधिकारी डॉ. शैलेश खंडारे व डॉ. शीतल ठक यांनी लसीकरणाचे महत्त्व, त्याचे फायदे तसेच गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून संरक्षणाबाबत सविस्तर माहिती दिली. लसीकरणामुळे भविष्यातील आरोग्य सुरक्षिततेसाठी कशी मदत होते, हे त्यांनी सोप्या भाषेत स्पष्ट केले. या उपक्रमामुळे विद्यार्थिनी व पालकांमध्ये लसीकरणाबाबत जागरूकता वाढून सकारात्मक प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमास मुख्याध्यापक खराटे सर, अरविंद शिंगाडे, खरात सर, पालक प्रतिनिधी संजय बांगर, विनोद लाहुडकर, परिचारिका नाजुका गवई, आशा वानखडे तसेच शिक्षकवृंद आणि विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८